
मधुकर तोरडमल

# तरुण तुर्क म्हातारे अर्क



# तरुण तुर्क म्हातारे अर्क

प्रा. मधुकर तोरडमल

PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..........
ESTD. 1981

मॅजेस्टिक प्रकाशन

तरुण तुर्क म्हातारे अर्क
3 (1980)
नाट्यपरीक्षण मंडळाचा दाखला क्र. DR VI 1603/72
पहिली आवृत्ती : नोव्हेंबर १९७२,
पाचवी सुधारित आवृत्ती : सप्टेंबर २००२.
© सौ. प्रमिला तोरडमल
'ज्ञानदेवी', साहित्य सहवास
वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.
प्रकाशक
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन,
८, फिनिक्स, ३ रा मजला
४५७, एस. व्ही. पी. रोड
गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

मुद्रक : प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे - ४११ ०३०

अक्षरजुळणी :
कल्पना कुलकर्णी
वरदायिनी टाईपसेटर्स
खोली नं. १२, प्लॉट नं. १/ए,
दफ्तरी रोड, पुष्पा पार्क,
मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७

मुद्रितशोधन : मनोहर ज. बोर्डेकर

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : ८० रुपये

दहा वर्षे अहमदनगर महाविद्यालयात शिकवीत असताना ज्या तरुण तुर्कांनी आणि म्हाताऱ्या अर्कांनी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करून माझ्या आयुष्यातला तो कालखंड सुवर्णमय केला, त्या माझ्या विद्यार्थी आणि सहकारी मित्रांच्या प्रेमाची ही अंशतः परतफेड

— मधुकर तोरडमल

या नाटकाचा मुंबईतील पहिला प्रयोग 'नाट्यमंदार'(मुंबई) या संस्थेने दिनांक ५ ऑक्टोबर १९७२ रोजी सायंकाळी ७ वाजता रवींद्र नाट्य मंदिर, मुंबई, येथे सादर केला.

## पात्र-परिचय

| | | |
|---|---|---|
| **थत्तेकाका** | : | दीनानाथ टाकळकर |
| **प्यारेलाल** | : | अविनाश मसुरेकर |
| **बंड्या पाठक** | : | मोहन मुंगी |
| **मुकुंदा** | : | सुधीर मुंगी |
| **डेप्युटी कलेक्टर** | : | तुकाराम भगत |
| **सौ. पार्वती देशपांडे** | : | सौ. विमल राऊत |
| **दमयंती** | : | कु. सीमा सावंत |
| **प्रा. बारटक्के** | : | प्रा. मधुकर तोरडमल |

| | | |
|---|---|---|
| **निर्माता** | : | राजाराम शिंदे |
| **दिग्दर्शक** | : | प्रा. मधुकर तोरडमल |
| **पार्श्वसंगीत आणि नेपथ्य** | : | राजाराम शिंदे |
| **प्रकाशयोजना** | : | विठ्ठल चव्हाण, सुरेश पाटील |
| **रंगभूषा** | : | प्रकाश तवटे |
| **वेषभूषा** | : | रामचंद्र घाडी |
| **ध्वनिमुद्रण** | : | भालचंद्र पेंढारकर |
| **ध्वनिक्षेपण** | : | मारुती पाटील |
| **व्यवस्था** | : | गंगाराम साळवी, चंद्रकांत येडूरकर |
| **रंगमंच** | : | कोंडिबा दळवी, गोपाळ बांद्रे, जयराम महाडिक, शशिकांत, मधू ढोलम, बाबू तोमाकंटी. |

# अंक पहिला
## दृश्य पहिले

*(कुठल्याशा एका कॉलेजची होस्टेल रूम नं. ८५. चार कॉट्सची. टेबल, खुर्च्या वगैरे- नेहमी होस्टेल रूममध्ये असणारे फर्निचर. वर्षाची सुरुवात आहे. रूममधल्या दोन कॉट्स बंड्या आणि प्यारेलाल या कॉलेजच्या दोन 'पुराण-पुरुषांनी' ताब्यात घेतलेल्या आहेत. प्यारेलाल हनुमानचड्डीत कॉटवर बसून दाढी करतो आहे. बंड्या ट्रंक उपशीत बसलेला आहे.)*

**बंड्या :** प्यारे! *(तो दाढीमध्ये गर्क)* अबे ओ कळकट...

**प्यारे :** हं ?

**बंड्या :** साल्या, आंघोळ वगैरे करणार आहेस काय आज ?

**प्यारे :** का ?

**बंड्या :** दाढी करतो आहेस म्हणून विचारलं.

**प्यारे :** दाढी रोज सकाळी करतो, सुव्वर. इट्स डेली सकाळ. आंघोळ संडे के संडे. इलस्ट्रेटेड वीकली. कपडे धोना दो हप्तेमें एक बार. फॉर्टनाइटली फिल्मफेअर. एनी मोअर क्वश्चन्स् ?

**बंड्या :** जुन्या घाणेरड्या सवयी काही जात नाहीत माझ्या ! चिकटपट्टी आहेस, साल्या. जुनी सवय आणि जुनी परीक्षा दोघींना चिकटून बसतोस घट्ट.

**प्यारे :** सिंपल रीझन. सवय स्त्रीलिंगी, परीक्षा स्त्रीलिंगी. स्त्रीलिंगी काहीही असलं, की प्यारे त्याला चिकटून बसतो. एनी मोअर क्वश्चन्स ?

**बंड्या :** उगीच नाही साल्या तुला प्यारे द कळकट म्हणत. एक मैलावरून वास येतो तुझा. वर्गात बाकावर तुझ्या शेजारी बसायलासुद्धा नाराज असतात पोरं.

तुझ्या बाकाला गॅस चेंबर म्हणतात सगळे.

प्यारे : नेव्हर माइंड. पोरांना मार गोळी. शेजारी पोरांना घेऊन बसायची सवय नाही आपल्याला...पोरी काय म्हणतात ते सांग. प्यारे प्यारे करीत पिंगा घालतात की नाही भोवती ?

बंड्या : पोरींचं कौतुक नको सांगूस मला. साल्या, आधीच गॅसवर आलेल्या असतात.... त्यांना गॅस चेंबर काय आणि गॅस सिलिंडर काय, सगळं गॅसिंग हवंच असतं.

प्यारे : जल गये ना ? बस. जळा, जळा, जळत राहा. किस्मत हमारे साथ है, जलनेवाले जला करें...

बंड्या : अरे हम जलनेवाले नहीं...करनेवाले हैं ।

प्यारे : करो करो, मगर खाली बकवास मत करो । पहिले कुछ कॉंक्रीट करो ।

बंड्या : हां हां, कॉंक्रिटच करेंगे आणि मग सांगेंगे...

प्यारे : सांगो सांगो...

बंड्या : सांगो काय, सांगतोच आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच सांगतो. ऐकून ठेव प्याऱ्या, हे वर्ष म्हणजे नुसती कत्तलची रात्र नाही केली, तर नावाचा बंड्या पाठकच नाही. बापाचं नाव सांगणार नाही आयला. आपण ठरवून आलोय. हे वर्ष म्हणजे दुसरं तिसरं काही नाही. बस राडा... राडा...आणि राडा. अरे अशी नुसती शिट्टी वाजवली... *(शीळ घालतो)* की शेपट्या हलवीत पोरगी आली पाहिजे समोर. इथे आल्या आल्या शकुनच तसा झालाय आपल्याला. *(पेटीतून चिनीबाईचा डोळा मारणारा एक फोटो काढतो.)* ये देख.

प्यारे : काय आहे ते ?

बंड्या : देख... बघ, बघ कसा मारू डोळा मारते. हाय...

प्यारे : अबे उल्लू के पठ्ठे, फालतू हाय हाय मत कर. ती लौंडी तुला डोळा नाही मारीत. तिचा डोळा म्हणजे पब्लिक प्रॉपर्टी आहे. हर एक पानाच्या ठेल्यावर टांगलेली असते ती आणि पानाचे दहा पैसे फेकणाऱ्या प्रत्येकाशी आँखमिचौली चालू असते तिची.

बंड्या : आपल्या बन्सी पानवाल्याकडून आणलंय हिला. मागच्या वर्षीपासून त्याच्यामागे लागलो होतो, मला दे म्हणून. देतो देतो करीत वर्ष घालवलं साल्यानं आणि आता दिली. इथे आलो त्याच दिवशी. म्हटलं, चला, शुभशकुन झाला. आता पवळ्यासाठी पानाच्या ठेल्यावर जायला नको. माझ्या कॉटसमोरच टांगून ठेवतो. कॉटवर पडलं रे पडलं, की हिनं डोळे मारायला सुरुवात केली पाहिजे.

प्यारे : साला पक्का भांडवलदार. आइ डोंट लाइक धिस मोनॉपॉली बिझिनेस हां... आइ वॉंट इक्वल डिस्ट्रिब्यूशन ऑफ वेल्थ.

बंड्या : आयला उन्हाळ्याच्या सुट्टीत रशियाला जाऊन आलास काय तू ?

प्यारे : मी नाही गेलो. रशियाच आलाय इकडे. बंडो बच्चू, आता अशी खाजगी बाई ठेवता येणार नाही तुला. तिच्यावर सीलिंग आणू आम्ही. तिची को-ऑपरेटिव्ह सोसायटी केलीस, तर इथे राहू शकेल ती...

बंड्या : आयला प्याऱ्या, तुझं नाव बदलायला पाहिजे आता. प्यारेलाल मुंदडाच्या ऐवजी प्यारेलालोव्हिच मुंदडोस्की ऊर्फ कळकटोस्की असं काहीतरी म्हणायला पाहिजे तुला.

प्यारे : यस्. असल्या इष्कबाजीच्या मामल्यात आपण एकदम तरुण तुर्क. यंग टर्क.

बंड्या : म्हणजे यंगोच्की टरकोस्की ! आयला, प्याऱ्या, नशीब आमचं इकॉनॉमिक्समध्ये तुला तीनच्यावर मार्क मिळाला नाही कधी एक. नाहीतर असल्या टरक्या बाता मारून अर्थमंत्री झाला असतास तू.

प्यारे : चुकतो आहेस. अरे इकॉनॉमिक्समध्ये नापास होतोय सारखा म्हणूनच अर्थमंत्री होण्याचा चान्स जास्त आहे मला. तेव्हा वेळीच सावध हो आणि त्या बाईला रूमच्या मधोमध टांग. जो रूममध्ये येईल, त्याला फ्री स्माइल आणि फ्री डोळा, सबको फ्री. फ्री लाइक एअर. एकदम पब्लिक चॅरिटी ट्रस्ट. आणि या रूममधले आपण चौघे पार्टनर्स ट्रस्टी.

बंड्या : ओ. के., ओ. के. सध्या तर राहू दे हिला इथे. *(चित्र ठेवतो.)* आयला कळकट, या दोन कॉट्सवर अजून कुणी आलेलं नाही. आपल्या दोघांची जोडी बेस्ट जमली. उरलेले दोन नग कोण येताहेत कुणाला माहिती ? आयला, काय शकुन आहे ! नेमकं या पुस्तकाचं नाव काय निघालं बघ....*(वाचीत)* बर्ड्स ऑफ द सेम फादर.

प्यारे : फादर नहीं बे - फेदर.

बंड्या : तेच ते फेदर काय आणि फादर काय... आपली गँग चांगली जमणं हा महत्त्वाचा मुद्दा. सालं आख्खं वर्ष काढायचंय. *(दारावर टकटक होते.)* यस कमिंग...*(जाऊन दरवाजा उघडतो. दारात मुकुंद भागवत उभा. गोरापान, नाजूक, सडपातळ, लाजत मुरकत बोलणारा, नुकताच प्री-डिग्रीला आलेला विद्यार्थी, बावरलेला, बुजलेला.)* कोण पाहिजे ?

कुंदा : थोडं बाजूला होता का प्लीज ?

बंड्या : *(बाजूला होत)* आयला !

कुंदा : *(सामान घेऊन आत येत)* कॉलेज लाइफची सुरुवात आहे माझी ही. प्री-डीग्रीला आलोय. माझं नाव कुंदा भागवत.

बंड्या : कुंदा ?

कुंदा : हो- म्हणजे किनय मुकुंदाचा शॉर्टफॉर्म आहे. मुकुंदा मला नाही आवडत. तो 'मु' कशाला मधेच फालतू. कुंदा कसं स्वीट वाटतं.

बंड्या : हो आणि कुंदा म्हणजे सुद्धा तसा स्वीटच नाही का ?

कुंदा : कित्ती छान बोलता हो तुम्ही. मला खूप बरं वाटलं. अहो, होस्टेलमधे शिरताना कित्ती घाबरलो मी. काळजाचा थरकाप उडाला नुसता. म्हटलं, नव्यानंच हे लाइफ सुरू होणार... कसे पार्टनर मिळतात. कसे वागतात. अगदी पहिल्या रात्री पतीच्या खोलीत शिरताना नववधूच्या मनात येत असेल ना, तसलं फिलिंग आलं मला या रूममध्ये शिरताना.

बंड्या : आयला !

कुंदा : पण तुम्ही एकदम आवडलात मला. अगदी लव्ह ॲट फर्स्ट साइट झालं.

बंड्या : मेलो, प्याऱ्या.

प्यारे : बोंबलू नकोस. मी तुझ्या आधीच मेलोय.

कुंदा : तुम्ही असं काय करताय ? माझं काही चुकलं का ? रूम नंबर ८५ हीच ना ?

बंड्या : रूम बरोबर आहे. पण होस्टेल चुकलात.

कुंदा : म्हणजे ?

बंड्या : अहो लेडीज होस्टेल शेजारीच आहे तिकडे.

कुंदा : आता मात्र मुळीच आवडलं नाही हं मला तुमचं बोलणं. लेडीज होस्टेलमध्ये जायला मी काय लेडी आहे ?

बंड्या : मला काय विचारताय ?

कुंदा : *(त्याच्याकडे जात)* मग तसं का बोललात ? सांगा, मी काय लेडी आहे ? *(त्याला धरून)* सांगा -

बंड्या : *(वैतागून)* आयला, आता मला काय माहिती लेडी आहे की लेडा आहे ?

प्यारे : हम बताते है....हा लेडी नाही. लेडा पण नाही. ये तो लौंडा है लौंडा.

कुंदा : फार फार वाईट्ट बोललात हो तुम्ही. तुम्ही माझा असा अपमान करता म्हणून पत्र लिहून मी यांना कळवलं, तर स्पेशल विमान करून इथे येतील आणि चांगली कणीक तिंबून काढतील तुमची.



बंड्या : आयला ! ह्यांना कळवलं तर ? कोण हे ?

कुंदा : तुम्हाला काय करायचंय. ते माझं सीक्रेट आहे. पण एक सांगून ठेवतो, माझा अपमान केलात किंवा किंचितसाही त्रास दिलात, तर एक दात शिल्लक ठेवणार नाहीत तुमच्या तोंडात.

बंड्या : म्हणजे दातांचे डॉक्टर वगैरे आहेत?

कुंदा : हो. आणि हाडांचेसुद्धा आहेत. हाडांचा पार भुगा होऊन जाईल, समजलात. *(मुरका मारून वळतो. बाईचं चित्र दिसतं.)* हे कुणाचं चित्र ?

बंड्या : बाईचं.

कुंदा : ते दिसतंय की. पण इथे कुणी आणलं ?

बंड्या : मी. का ?

कुंदा : असल्या बाईचं चित्र तुम्ही रूममध्ये ठेवता ?

बंड्या : असल्या म्हणजे ?

कुंदा : फार चावट बाई आहे ही. आपण तिच्याकडे पाहिलं ना, की एक डोळा मुडपते.

बंड्या : बाईनं डोळा मुडपलेला तुम्हाला आवडत नाही ?

कुंदा : आवडतं, पण मी ते मनातल्या मनात ठेवतो. मला असला फाजीलपणा आवडतो हे कानावर गेलं, तर केवढे संतापतील हे...

बंड्या : पुन्हा हे !

कुंदा : *(हसून)* मी आत्ता सरसं करून आलो हं. अगदी एका मिनिटात. *(टॉवेल, ब्रश वगैरे घेतोय)* बाथरूम कोठे आहे ?

बंड्या : डाव्या बाजूच्या कोपऱ्यात... *(तो 'थँक्यू' म्हणत जातो.)* आयला, आपण तर हैराण झालो यार प्यारे, हे वर्ष काही खरं दिसत नाही आपलं.

प्यारे : हां यार. ये कंबख्त ! लौंडा कहाँ से आ टपका यहाँ ?

बंड्या : पनोती साली. आली ते आली आणि नेमकी आपल्याच बोडक्यावर येऊन आदळली. आधी एक तू कळकट होतासच; आता हा लेडीजकट. आपले साले स्टार्सच भिकार दिसताहेत या वर्षी. मटका लावायची काही सोय नाही. ह्यः *(वैतागून उठतो.)*

प्यारे : छोड यार, घे, चारमिनार घे. एक दम मार, डोकं उतरून जाईल. *(सिगरेट बॉक्सवर आपटीत)* अरे दम मारो दम....मिट जाये गम...

बंड्या : प्याऱ्या साल्या, आधी मी काय सांगतो, ते ऐक. दम मागून मार. हे सालं दळभद्रं आलंय ना आपल्या खोलीत, त्याला आत्ताच ठिकाणावर आणला